# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

गुरुवार दि. ६ मार्च १९९७ रोजी झालेल्या मंडळाच्या सन १९९७-९८ सालच्या अर्थसंकल्पीय बैठकीचा व नियमित ४२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

........

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. ६ मार्च १९९७ रोजी दुपारी १२.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण, | सभापती. |
| २] | श्री अशोक लाल. | मुख्य अधिकारी. |
| ३] | ,, वि. म. कोकणे. | उपसचिव/महाराष्ट्र शासन. |
| ४] | ,, चंद्रकांत विश्वासराव. | सदस्य. |
| ५] | ,, अमोद उसपकर. | ,, |
| ६] | ,, भालचंद्र ठाकूर. | ,, |
| ७] | ,, दगडू सकपाळ. | ,, |
| ८] | ,, प्रकाश भूवड . | ,, |
| ९] | ,, दिलीप गोडांबे. | ,, |
| १०] | ,, गणेश तिकोने. | ,, |
| ११] | डॉ. विनोद मेहता. | ,, |
| १२] | श्री अनंत पालकर. | ,, |
| १३] | ,, अभय सावरकर. | ,, |
| १४] | ,, दाजी मोडक. | ,, |
| १५] | प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी. | निमंत्रक. |
| १६] | उपकर निर्धारक व संकलक[शहरे] म. न. पा. | ,, |

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे स्वागत करुन सन १९९६-९७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९७-९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर केले. तसेच श्री चौधरी, मु. ले. अ. यांनी अर्थसंकल्पातील आकडेवारीसहीत दुरुस्ती मंडळाच्या जमाखर्चाची माहिती सभागृहास दिली.

मा. सभापती श्री मधु चव्हाण यांनी अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या भाषणात असे सांगितले की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे ५ वे स्वतंत्र शिल्लकी अंदाजपत्रक मंडळाच्या आजच्या बैठकीपुढे ठेवताना त्यांना आनंद होत आहे.

१९९७-९८ या वर्षी ८००७.५१ लाख रुपये जमेत आहेत तर ७३१३.३३ लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच ६९४.१८ लक्ष रुपयांची शिल्लक दाखविली आहे व हे प्रगतीचे लक्षण आहे. व अभिमानास्पद आहे. युतीच्या शासनाचे मुंबईच्या मूळ रहिवाशांबद्दल [जे चाळीत व प्रतिक्षा नगरात रहात आहेत] धोरण प्रतिबिंबीत होणारे पहिले अंदाजपत्रक त्यांनी गेल्या वर्षी सादर केले होते. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीची अंमलबजावणी प्रभावीपणे झाल्याचे प्रतिबिंब या वर्षी आपल्याला पहायला मिळते. १९९७-९८ या पुढील वर्षाकरिता स्विकारलेल्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी काही योजना आखल्या आहेत. प्रस्तुतचा अर्थसंकल्प मंडळापुढे मांडण्यापूर्वी अधिक वर्षाचा आढावा घेणे आवश्यक आहे., असे त्यांनी प्रतीपादन केले.

-- : दुरुस्ती विभाग :--

÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷

सन १९९५-९६ साली मंडळाच्या इमारतींच्या दुरुस्तीची ४१४ कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. त्यावेळी २०.८६ कोटी रुपये खर्चाची तरतुद केली होती. मात्र सन १९९५-९६ मध्ये संरचनात्मक दुरुस्तीची ४१७ कामे पूर्ण केली व त्यावर २१.५० कोटी रुपये खर्च झाला होता. चालू म्हणजे १९९६-९७ साली संरचनात्मक कामे ६३२ पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. माहे.जाने-१९९७ पर्यंत मंडळाने ५२३ इमारतींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण केली होती व त्यावर सुमारे २६.०३ कोटी रुपये खर्च झाला आहे. थोडक्यात १९९७-९८ मध्ये ५१६ कामे सुरु करावयाची होती. परंतु मंडळ ७०० कामे सुरु करणार आहे.

१९९५-९६ साली ३५.०० कोटी रुपये उपकराची वसुली अपेक्षित होती, त्यापैकी २९.२० कोटी रुपयाची वसुली शासनाकडून झाली. १९९६-९७ साली प्रत्यक्ष ३५.१५ कोटी रुपये उपकर जमा झाला आणि पुढील वर्षासाठी ३५.१५ कोटी रुपयाची उपकर वसुली होईल. शासनाचे अनुदान २२.०० कोटी रुपये १९९७-९८ या वर्षाकरिता मिळेल असे गृहीत धरण्यात आले आहे. मा. वित्त मंत्र्यांनी २२.०० कोटी रुपयांची तरतुद करण्याचे आदेश दिलेले आहेत. या आधारावर अंदाजपत्रकाची तयारी करण्यात आलेली आहे. सुकथनकर समितीने अंतरिम अहवालात केलेल्या शिफारशीमध्ये ही रक्कम थोडी पेक्षा जास्त आहे व शासनाने तो अंतरिम अहवाल स्विकारला आहे, ती शिफारस अशी आहे की, जेवढा उपकर गोळा होतो तेवढी रक्कम किंवा रु. ५०.०० कोटी इतके शासनाने दरवर्षी अनुदान द्यावे.

## —: संक्रमण शिबीरे :—

संक्रमण शिबीराची अवस्था अतिशय भयानक होती व याची दखल मंडळाने गेल्या वर्षी घेतली. नागरी सुखसोयींचा मोठ्या प्रमाणात अभाव व अनारोग्यकारक स्थिती होती. हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे जाहीर केले होते. याकरिता अर्थसंकल्पात ३.१५ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात जानेवारी-१९९७ पर्यंत ४.७८ लक्ष रुपये खर्च करून, नवीन गटारे, जुनी शौचालये तोडून नवीन बांधण्यात आली. पाणीपुरवठा करणा-या जलवाहिन्या काही ठिकाणी नवीन टाकल्या. तर काही ठिकाणी नवीन जलवाहिन्या जोडल्या. ही सर्व रक्कम नागरी सुखसोयींवर खर्च करण्यात आलेली आहे. काही नवीन संक्रमण गाळे बांधण्यासाठी १.०० कोटीची तरतुद ठेवली होती. त्यापैकी रु. ००.५१ कोटी इतकी जानेवारी-१९९७ पर्यंत खर्च आला आहे. संक्रमण शिबीरामध्ये भाडे थकबाकी असल्याचे मंडळाच्या लक्षात आल्यानंतर, त्याकरिता भाडेवसुलीची मोहीम सुरु केली. भितीपत्रके, लावणे, सुट्टीच्या दिवशी भाडेवसुली करणे, भाडे थकबाकी ठेवण्याची सवय लागलेल्या गाळेधारकांकडून, म्हाडा कायदा तरतुदींचा उपयोग करून, लक्षणीय भाडे वसुली करण्यात आले. संक्रमण शिबीरात १९९५-९६ या वर्षी १८५.६५ लक्ष रक्कम मंडळास प्राप्त होणे अभिप्रेत होते. पैकी १४९.४६ लक्ष म्हणजे सुमारे ८०.५१ टक्के वसुली करण्यात मंडळास यश आले होते. संक्रमण शिबीरातील भाडेवसुली १९९६-९७ साली अपेक्षित वार्षिक मागणी रु.१९९.७४ लक्ष इतकी अपेक्षित होती. त्यापैकी जानेवारी-१९९७ पर्यंत १५०.८४ लक्ष रक्कम म्हणजे ९०.६२ टक्के भाडेवसुली करण्यात आलेली आहे.

## : पुनर्रचना विभाग :

मंडळाने सर्वसाधारणात: दुरुस्तीच्या कामावर गेल्यावर्षी २४.५७ कोटी रुपये खर्च केले. परंतु पुनर्बांधणीवर मात्र सर्वसाधारणात: ८.०० कोटी रुपये खर्च केले आहेत. दुरुस्तीच्या तुलनेने पुनर्रचनेचे काम अतिशय कमी आहे. डिसेंबर-१९९६ पर्यंत १५ इमारती बांधून पूर्ण झालेल्या आहेत. त्यामध्ये १००५ गाळे तयार झाले आहेत. मूळ भाडेकरुंना गाळे देऊन, यापैकी १८२ गाळे अतिरिक्त आहेत. सध्या १२ ठिकाणी पुनर्रचनेची कामे सुरु आहेत व डिसेंबर-१९९७ पर्यंत ही कामे पूर्ण होऊन, त्यातून १०९६ गाळे उपलब्ध होतील. त्यापैकी ५० गाळे अतिरिक्त उपलब्ध होतील. पुढील वर्षासाठी १२ ठिकाणी पुनर्बांधणीची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी ५ ठिकाणी कामाला सुरवात झालेली आहे. या ५ ठिकाणी ५८६ गाळे उपलब्ध होतील. तर ७ प्रकल्प पुढील काही महिन्यात सुरु करण्यात येतील.

त्यामध्ये ४५० गाळे उपलब्ध होणार आहेत. यापुढे ज्या इमारतींची पुनर्बांधणी होणार आहे त्या गाळ्यांचे क्षेत्रफळ १८० चौ. फूटाचे ऐवजी प्रत्येक गाळा २२५ चौ. फूटाचा असेल.

पुनर्रचित इमारतींच्या गाळ्यांची भाडेवसुली १९९५-९६ साली रु. ४६५. ०४ लक्ष वसूल होणे अपेक्षित होते. त्यापैकी ४००. ९८ लक्ष म्हणजेच ८६. २२% [टक्के] इतकी रक्कम वसुल करण्यांत आली. १९९६-९७ साली ही रक्कम ४८७. १८ लक्ष इतकी वसुल करणे आवश्यक होते. त्यापैकी जानेवारी-१९९७ पर्यंत ३६७. ५० लक्ष इतकी रक्कम म्हणजेच सुमारे ९०. ७७% [टक्के] इतकी रक्कम वसुल करण्यात आली. पुनर्रचित इमारतीमध्ये सुध्दा ६४. ०० लाख रुपये थकबाकी होती व ही थकबाकी वसुल करण्यासाठी मोहीम आखण्यात आली व लक्षणीय अशी वसुली करण्यात आली.

संक्रमण शिबीरातील गाळे व पुनर्रचित इमारतीतील गाळे मिळून गेल्या वर्षापेक्षा अधिक भाडेवसुली करण्यांत आली आहे. उदा. १. ४. ९५ ते ३१. १. ९६ या १० महिन्याच्या काळात ४५२. ८५ लाख इतकी भाडेवसुली झाली. तर १. ४. ९६ ते ३१. १. ९७ या १० महिन्यात ५१८. ३४ लाख इतकी भाडे वसुली झाली. म्हणजे मंडळाने योजनापूर्वक केलेल्या प्रयत्नामुळे मागील वर्षाच्या तुलनेने यावर्षी ६५. ४९ लाख रुपये भाडे वसुली अधिक झाली. याबद्दल त्यांनी संक्रमण शिबीर व पुनर्रचना गाळे या विभागातील मुख्य भाडेवसुलीकार, भाडेवसुलीकार व त्या कार्यालयातील अधिका-यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

पुनर्बांधणीच्या अनेक योजना, न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे रखडल्या आहेत, त्याची वर्गवारी करुन, १५ योजनांपैकी ७ योजनांची स्थगिती उठवून कार्यान्वित झाली आहेत. उदा. फोर्ट मधील ७८, मोरा बाजार मार्गावरील एक योजना १९७५ सालापासून रखडली होती त्यावरील स्थगिती आदेश उठवून योजना आता कार्यान्वित झाली आहे. पुनर्रचित गाळ्यांमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात खोट्या कागदपत्राच्या आधारावर दलालांनी गाळे ताब्यात घेऊन, त्यांची बेकायदेशीर विक्री कांही आपल्या अधिका-यांबरोबर संगनमताने केली. हे प्रकरणसुध्दा गुन्हा अन्वेषण विभागाकडे सोपवून त्याचा शोध घेऊन, आज अनेक दलाल तुरुंगात आहेत.

## बृहत्सूची ( Master List )

सन १९७० पासून संक्रमण शिबीरात विविध कारणांमुळे इमारती पुनर्रचित न झाल्यामुळे अनेक भाडेकरु नवीन इमारतींची वाट पहात होते अशा सर्व भाडेकरुंची एक पूर्णत: न्याय्य पध्दतीने बृहत्सूची तयार करुन, त्याला उच्च न्यायालयाकडून मान्यता मिळवून त्याप्रमाणे गाळे वाटप करण्याचा निर्धार मागच्या वर्षी केला होता. या बृहत्सूचीमध्ये ११२७ भाडेकरुंची नावे होती. १५ ऑगस्ट १९९६ रोजी यापैकी काहींना वितरणपत्रे देण्यात आली व त्याची छाननी करुन, ३ डिसेंबर १९९६ रोजी मा. मुख्य-

पैऱ्यांच्या नसते त्यांना सदनिका देण्यात आल्या. आतापर्यंत ३८३ हक्कदारकांना गाळे वाटप झालेले आहे. ७४४ हक्कदारक अजूनही बृहद्सूचीमध्ये आहेत. या डिसेंबर-१९९७ अखेरपर्यंत ही सर्व यादी,गाळेधारकांना गाळे देऊन संपलेली असेल असे त्यांनी आश्वासन दिले.

## संकल्पपूर्ती

गेल्यावर्षी अर्थसंकल्प सादर करताना मा. सभापती यांनी अनेक योजना व निर्णय जाहिर केले होते. त्यापैकी मुख्य अधिकारी, सर्व अधिकारी, अभियंता, कर्मचारी आणि मंडळातील मा. सदस्य सहकारी यांच्या सहकार्याने व मदतीने मागील संकल्प पुरे केले आहेत.

[१] इमारत दुरुस्तीसाठी कंत्राटदारावर अंदाजपत्रकाच्या आधारानंतर वर्गवारी करून,दुरुस्ती करण्यासाठी कालमर्यादा घातली व दुरुस्तीचा कालावधी कमी करण्यात आला.

[२] दुरुस्तीच्या कामात दिरंगाई करणाऱ्यांवर १०.०० रुपये ते १००.०० रुपयापर्यंत दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

[३] वास्तुशास्त्रज्ञांची शुल्क ३००.०० रुपयावरुन १५००.०० रुपयांपर्यंत केले.

[४] यापूर्वी बांधण्यात येणाऱ्या इमारतींवर संरक्षणात्मक कठडे बांधले जात नसत ते आता नवीन पुनर्रचित इमारती बांधल्या जात आहेत त्या इमारतींच्या गच्चीवर कठडे बांधण्याच्या आराखड्यात तरतूद करुन, त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरु झालेली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करुन, भाडेकरूंच्या म्हाडा कार्यालयातील १०३ प्रमाणे २२ योजना मंजूर केल्या व जादा देण्यात येणाऱ्या क्षेत्रफळाचा आकार निश्चित करण्यात आला आहे.

[५] वास्तुशास्त्रज्ञांची १०% [टक्के] ऐवजी ६% [टक्के]शुल्क कमी करण्यात आले.

[६] सं. शि. तील व पुनर्रचित गाळ्यातील थकबाकी मोठ्या प्रमाणात वसूल करण्यात आली.

[७] ८८ वास्तुशास्त्रज्ञांवर कामचुकारपणाबद्दल/बेजबाबदारपणाबद्दल कारवाई करण्यात आली.

[८] गाळ्यांची हस्तांतरण प्रक्रीया उठविण्यात आली होती. हस्तांतरण शुल्कामध्ये वाढ करुनही योजना आता कायम स्वरुपी सुरु करण्यात आली आहे. परिणामत: अनेक अधिकृत गाळेधारकांना नांवावर नसलेले आपले गाळे आता नांवावर करता येतील.

[९] पंपचालक व सफाई कामगारांच्या पगारामध्ये तुलनेने वाढ करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला. लवकरच त्यांची अंमलबजावणी होईल.

[१०] दलाल व घुसखोरांविरुध्द निर्णय घेतल्याप्रमाणे मोहिम सुरु करुन, मोठ्या प्रमाणात कारवाई जास्ती करण्यांत आली.

[११] मुंबई शहरामध्ये उपकरप्राप्त इमारत कलम ८८[३]"अ" घोषित झाल्यानंतर धोका टाळण्यासाठी वरच्या मजल्याच्या छतापर्यंत इमारत पाडण्यात येते व रहिवाशांना सं.शि.त हलविण्यात येते, अशा प्रकरणांपैकी ५-६ इमारतींच्या प्रकरणामध्ये भू-संपादनाच्या बाबतीत तेथिल तळमजल्याच्या रहिवाशांकडून काही न काही कारणाद्वारे न्यायालयातर्फे भू-संपादनात स्थगिती आणत असत. त्यामुळे पुनर्रचनेच्या कार्यक्रमामध्ये अनाठायी विलंब होत होता. अशा प्रकरणी न्यायालयात प्रकरण लावून मांडून स्थगिती आदेश उठवून पुनर्बांधणीच्या कार्यवाहीस चालना देण्यांत आली.

[१२] सं.शि.तील घुसखोरांबाबत सक्षम अधिकारी व शहर दिवाणी न्यायालयामध्ये अनेक वर्षांपासून प्रकरणे स्थगितीमुळे प्रलंबित होती. परंतु घुसखोरांच्या बाबतीत स्थगिती देणे नैसर्गिक न्यायास धरुन नसल्याचे न्यायालयास पटवून देण्यांत आले व असा स्थगिती प्रस्ताव रद्दबातल करण्यांत येऊन, सक्षम प्राधिकाऱ्यांकडे असलेली व शहर दिवाणी न्यायालयात असलेली प्रकरणे सत्वर मार्गी लावण्यांत आली.

[१३] परेल येथील वाणी चाळीत एकूण ७६ अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार होते. विकास नियंत्रण नियमानुसार महानगरपालिकेला ३८ गाळे देणे आवश्यक होते. महानगरपालिकेने सदर गाळे प्रत्यक्ष ताब्यात मिळाल्याशिवाय या इमारतीला [वाणी चाळ] वापर परवाना देणार नाही असे कळविले होते. सदर इमारत उपकरातून बांधली गेली असल्यामुळे व हा निर्णय बृहन्मुंबई मधील लोकांवर अन्यायकारक असल्यामुळे महानगरपालिका आयुक्तांकडे जातीने पाठपुरावा करण्यांत आला व वरिल परिस्थिती तसेच मा. न्यायमूर्ती सुजाता मनोहर यांचा आदेश दाखविण्यांत आला व तात्पुरता वापर परवाना मिळविण्यांत आला.

[१४] यापूर्वी मंडळाला १.०० कोटी रुपयापर्यंतचे पुनर्रचित इमारतींच्या निविदा मंजूर करण्याचे अधिकार होते व यावरिल सर्व निविदा प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठविण्यांत येत असत. त्यामुळे यांना कार्यान्वित होण्यास विलंब लागत असे. प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये ही गोष्ट निदर्शनास आणून, ही मर्यादा वाढविण्याची विनंती करण्यांत आली होती. मा. अध्यक्ष/प्रा. यांनी ५.०० कोटी रु. पर्यंतच्या निविदा मान्य करण्याचे अधिकार मंजूर करण्यांत आले.

वरील काही प्रमुख बाबी सोडून अनेक परिणामकारक योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यांत आली आहे.

वित्तीय
=========

१९९७–९८ च्या अर्थसंकल्पात ऐंशी कोटी चालू ८००७.५९ लाख रुपये इतकी रक्कम जमा अपेक्षित आहे. यावर्षी उपकर ३५१५.०० लाख अपेक्षित आहे. मुंबई महानगरपालिकेशी सतत संपर्क ठेऊन, उपकराची वसुली ७०.०० कोटी रुपये करण्याचा मंडळाचा प्रयत्न राहील. भाडे व सेवाशुल्का पोटी ८०५.०० लाख ठरविले आहेत. ही रक्कम पूर्णतः वसुल करण्याची योजना आखण्यात आलेली आहे. पुढील वर्षी संरचनात्मक दुरुस्तीची कामे व पुनर्रचनेची कामे यासाठी जी तरतुद करण्यांत आलेली आहे त्याचा पूर्ण विनियोग करण्यांत येईल.

सुकथनकर समिती
==============

मुंबई बेटावरील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या इमारतींची दुरुस्ती मोठ्या प्रमाणात व्हावी व पुनर्रचनेच्या कामाला गतीमान चालना मिळावी म्हणून सर्वंकष विचार करुन, शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी सुकथनकर समितीचे गठन याच कालात झाले. सुकथनकर समितीने आपला अंतरिम अहवाल १८ डिसेंबर १९९६ रोजी सादर केलेला आहे. त्यामध्ये अनेक विधायक सुचना करण्यांत आलेल्या आहेत. संदर अहवाल मा. मुख्य मंत्री यांनी नागपूर अधिवेशनात सादर केला होता. मंडळाने गेल्या वर्षी पुनर्रचित इमारतीचे गाळे १८० चौ. फुटाऐवजी प्रत्येक गाळा कमीत कमी २२५ चौ. फुटाचा असावा हा प्रस्ताव मंजूर केला होता. सुकथनकर समितीने ही मागणी पूर्णतः मंजूर करुन, शासनाला शिफारस केली व शासनानेही ती मंजूर करुन, त्याप्रमाणे धोरण जाहिर केले. यापुढे ज्या इमारती पुनर्रचित होणार आहेत त्या इमारतींचे गाळे कमीत कमी २२५ चौ. फुटाचे असावेत असा आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यांत आलेले आहेत. तसेच त्यामध्ये यापुढे विद्युत उद्वाहनाची सोय करण्याचे योजिले आहे.

सुकथनकर समितीचा अहवाल आता जवळजवळ पूर्ण होत आलेला आहे. गेल्यावर्षी मंडळाने कारभारात सुधारणा करण्यासाठी, पुनर्रचनेच्या कामाला प्रचंड गती मिळावी व कामाची उत्कृष्टाचे, विविध सुचनांचे, विविध प्रस्ताव मंजूर केले होते. हे सर्व प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठविले होते. शासनाने या सर्व सुचनांवर सर्वांगीण विचार करण्यासाठीच सुकथनकर समितीची नियुक्ती केली होती. या समितीच्यापर्यंत शासनाला अहवाल सादर करण्यांत येईल व शासन यावर लवकरच निर्णय घेईल याचा त्यांना विश्वास आहे. गोपनीयतेचा भंग न करता त्यांनी असे नमुद केले की, या अहवालामध्ये अनेक गोष्टी क्रांतिकारक असतील. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या गंभीर प्रश्नावर

२५

साधकबाधक चर्चा करून, अनेक निर्णय व्यवहाराच्या कसोटीवर तपासून घेण्यात आले आहेत. हा आराखडा शासनाने स्विकारल्यानंतर मंडळाची आर्थिक बाजूही मजबूत होईल. परंतु मुंबई बेटावरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

## आढावा बैठक.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, त्यांनी या पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर पुनर्रचना विभाग, सं. शि., भाडेवसुली व परिरक्षण या कार्यालयांची दर महिन्याला संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन आढावा घेण्याची प्रथा सुरू केली. त्यामुळे बैठकीतील संयुक्त निर्णयामुळे मंडळाच्या कारभारात लक्षणीय सुधारणा झालेली आहे व तक्रारी संपलेल्या नसल्यातरी तक्रारींचे प्रमाण फारच कमी झाले आहे.

चालू सन १९९७-९८ अर्थसंकल्पीय वर्षामध्ये पूर्ण करावयाच्या कामा बाबत मा. सभापतींनी खालील कामे पूर्ण करण्याचा संकल्प केला.

[१] बृहतसूचीमध्ये असलेली प्रतिक्षा यादी येत्या ८ महिन्यात संपविणार आहे.

[२] संक्रमण शिबीर या विभागाची पुनर्रचना करणार.

[३] हस्तांतरण करण्यासाठी जे अर्ज आलेले आहेत, त्यावर ६ महिन्यात निर्णय घेऊन, ही प्रक्रीया पूर्ण करणार.

[४] सं. शि. त राहाणारे गाळेधारक सर्व जुन्या इमारती व पुनर्रचना इमारतींची सर्व माहितीचे संगणकीकरण करून, डिसेंबर-१९९७ अखेरपर्यंत पूर्ण करणार.

[५] सं. शि. तील घुसखोरांचे न्यायालयातील प्रकरणे सोडवून पूर्ण उच्चाटन करणार.

[६] न्यायालयातील प्रकरणांना सुध्दा अग्रक्रम देऊन, घुसखोरीचे प्रश्न तोडीस नेणार.

## अधिकारीवर्ग व कर्मचारीवर्ग.

सभापती पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर सर्वसाधारणत: मुख्य अधिकाऱ्यांपासून सर्व अभियंते, अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांची त्यांना उत्तम साथ मिळाली. यातील अनेक मंडळी अतिशय तळमळीने व प्रामाणिकपणे काम करीत आहेत असे त्यांनी नमुद केले. भाडेवसुलीकारांची संख्या फारच कमी आहे. अनेक विभागात एका अधिकाऱ्याला २ पदांचा कारभार सांभाळावा लागतो. साधनांचीही कमतरता आहे. अनेक विभागीय कार्यालयात जागाही अपुरी आहे. या सर्व अडचणींवर मात करण्याचा आग्रहपूर्वक प्रयत्न राहिल.

मा. सभापती यांनी अर्थसंकल्पीय अध्यक्षीय भाषणाचा समारोप करताना

962 ९७

भावपूर्ण शब्दात असे नमूद केले की, या मुंबईच्या जडणघडणीमध्ये सुमारे १०० वर्षांपासून ज्या मुंबईकरांचा सहभाग आहे. सर्वसाधारणतः अशा माणसांच्या घरासंबंधी हे सर्व मुंबईकर बंधु-भगिनी या शहराच्या बाहेर फेकले जाणार नाहीत याची पूर्ण दक्षता शासन जातीने घेऊ या. मुंबईत राहात असलेल्या ठिकाणीच आपल्या घरात त्यांना स्वाभिमानाने राहाता येईल यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व युती सरकार योजनापूर्वक यशस्वी प्रयत्न करील. या सर्व कार्यामध्ये आपली मंडळाचे सन्मा-ननीय सदस्यांनी त्यांना पूर्ण सहकार्य दिले आहे. त्यांचे मार्गदर्शन मंडळातील बैठकी-मध्ये होणारी चर्चा त्यांना नेहमीच मार्गदर्शक ठरते, असेच मार्गदर्शन व सहकार्य सतत मिळावे, हीच अपेक्षा.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ध्येय धोरणे स्पष्ट व्हावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची रूपरेषा थोडक्यात माहिती व्हावी म्हणून अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी ही प्रस्तावना अनिवार्य आणि पार्श्वभूमीवर त्यांनी सन १९९६-९७ चा सुधारित व १९९७-९८ चा अर्थसंकल्प मंडळाच्या मंजूरीसाठी सादर करीत आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, त्यांना पूर्ण विश्वास आहे, मा. सदस्य सादर अभ्यासपूर्ण व सखोल चर्चा करून, आवश्यक वाटल्यास योग्य विधायक सूचना करून, हा अर्थसंकल्प एकमताने मंजूर करतील.

तद्नंतर मु. ले. अ. श्री. चौधरी यांनी दुरुस्ती मंडळाकडील जमा खर्चाची आकडे-वारी सभागृहास विदीत केली.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मा. सदस्य श्री. दगडू सकपाळ यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सुधनकर समितीच्या शिफारसीनुसार भाडेकरूंना यापुढे किमान २२५ चौ. फू. कारपेट क्षेत्रफळाच्या सदनिका मिळणार आहेत. परंतु मंडळाकडे सध्या जर १८० चौ. फू. क्षेत्रफळाच्या सदनिका उपलब्ध आहेत त्या तांतडीने वितरण न केल्यास भाडेकरू/रहिवाशी मोठ्या सदनिकांचीच मागणी करतील. यावर मा. सभापती यांनी असे स्पष्ट केले की, मास्टरलिस्ट वरील भाडेकरूंना वाटप चालू आहे.

मा. सदस्य श्री. आचरेकर यांनी अशी शंका उपस्थित केली की, आज जो सन १९९७-९८ चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे तो शिलकी अर्थसंकल्प आहे, परंतु शासनाकडून मिळणारे अनुदान व म्हाडा प्राधिकरण जमा होणाऱ्या निधीत पुढे निश्चितच घट निर्माण होणारी शक्यता नाकारता येत नाही, तरी शिलकी अर्थसंकल्पाबाबत त्यांनी शंका व्यक्त केली. यावर मा. सभापतींनी खुलासा करताना स्पष्ट केले की, महानगरपालिका/शासनाकडून मिळणारे अंशदानात घट निर्माण होणार नाही आणि आपण ठरविले आहे की दुरुस्ती कामे करणार आहोत त्यापेक्षा जास्त खर्च दायित्व निर्माण होणार नाही, त्यामुळे सदर अर्थसंकल्प शिलकीमध्ये येत आहे.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी आजच्या अर्थसंकल्पात फक्त ८.०० कोटी रुपये दाखविण्यात आले आहेत. तरी त्यांनी असे मत मांडले की, पुनर्रचनेतील अडचणी दूर करुन जास्तीतजास्त इमारतींची पुनर्बांधणी करण्यात यावी. मा. सदस्य श्री. प्रकाश भूवड यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत खुलासा करताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, पुनर्रचनेच्या मानाने इमारत दुरुस्तीवर तीन पट जास्त खर्च होतो. कारण इमारत दुरुस्ती करणे हा पुनर्रचनेपेक्षा सोयीस्कर मार्ग आहे. पुनर्रचनेसाठी एका इमारतीस ७० ते ८० लाख रुपये एवढा खर्च अपेक्षित असतो. याबाबत शासनाने सुध्दा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देऊन घरमालक/विकसक यांना पुनर्बांधणी योजनेत सहभागी करुन घेतले आहे.

मुख्य अधिकारी यांनी असे मत मांडले की, मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या देखभालीच्या प्रश्नाबाबत मंडळास आज ना उद्या गंभीरपूर्वक विचार करावाच लागेल. विशेषत: संक्रमण शिबीरांची देखभालीची अवस्था [illegible] समाधानकारक नाही. त्यानी असे निदर्शनास आणले की, पुनर्रचित इमारतीतील गाळयाचे भाडे १९७७ नंतर वाढविण्यात आलेले नाही. ते अजूनही ५० पैसे प्रति चौ. फू. असे आकारले जाते. मंडळ फक्त दरवर्षी सेवा शुल्कात केवळ रु. ३ ते रु. ५ ने वाढ करते. संक्रमण शिबीरातील भाडेकरु मंडळास भाडे न भरता ते मुळ मालकास भाडे भरतात. त्यांच्याकडून मंडळ सेवा शुल्कापोटी रु. ६० ते रु. ७० घेते. त्यामुळेच देखभालीची अवस्था समाधानकारक नाही. दरवर्षी मंडळाला ६ कोटी रुपयांचा तोटा देखभालीपोटी सहन करावा लागतो. एका बाजूला मंडळाकडे ८ कोटी रुपये सेवाशुल्क/भाडयाच्या स्वरुपात जमा होतात तर दुसरीकडे मंडळाला प्रॉपर्टी टॅक्स, विज पुरवठा, पाणी पुरवठा, स्वच्छता यापोटी लागणाऱ्या खर्चाचा विचार करता ६ कोटी रुपयांचा तोटा मंडळास सहन करावा लागतो. आपण यामध्ये जर उल्लेखीनय वाढ करावयास गेलो तर जो निधी आज दुरुस्तीसाठी व पुनर्रचनेसाठी उपलब्ध आहे त्या निधीमध्ये मंडळास घट करावी लागेल. म्हणून भाडेवाढीबद्दल मंडळाने गंभीरपूर्वक विचार करावा अशी विनंती सर्व सन्मा. सदस्यांना केली.

मा. सभापती यांनी सुकथनकर समितीस विनंती केली आहे की, सध्या मंडळास जे ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक मिळतो तो वाढूवन ४.०० चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात यावा. सुकथनकर समितीची भूमिका याबाबत सहानुभूतीची आहे असे त्यांना वाटते. जर वाढीव चटईक्षेत्रा मिळाले तर ते वापरण्यासाठी मंडळाला तळ+सात मजल्यांच्या इमारती बांधणे शक्य होईल. त्यामध्ये उदवाहनाची [लीफट] सुविधाही उपलब्ध करुन देणे शक्य होईल. ज्यांना

२१

चौथ्या किंवा पाचव्या मजल्यावर गाळे देण्यात येतात त्यांच्यापैकी काही लोक वयस्कर असतात, काहींना रक्तदाबाचा/हृदयविकाराचा त्रास असतो. अशा लोकांना चौथ्या किंवा पाचव्या मजला सोयीस्कर नसतो. एकदा का आपण इमारतीत उद्वाहनाची सुविधा केली की, कॅपिटल कॉस्टनंतर साधारणत: दरमहा प्रत्येक गाळाधारकाकडून रु. १००/- उद्वाहनाच्या देखभालीसाठी अतिरिक्त आकारावे लागतील.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे सुचविले की, भाडेवाढ जर करावयाची असेल तर देखभाल विभाग प्रथम सुधारावा लागेल. यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, देखभालीची जबाबदारी मंडळाने घेतली हीच मोठी चुक झालेली आहे. सुकथनकर समितीही देखभालीची जबाबदारी शासनावर न टाकता ती भाडेकरुंनीच घेण्याबाबत विचार करीत आहे असे वाटते. मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, देखभालीच्या संदर्भात कोठलीही तक्रार घेऊन मंडळाकडे भाडेकरु गेला असता, मंडळाकडे पैसे नसतात व माणसेही नसतात. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सुचविले की, भाडेकरुंकडून भाडे व सेवा आकार घेणे पूर्णपणे बंद करावे असे वाटते. मंडळाने फक्त मालमत्ता कर, पाणीपट्टी, विज बील व स्वच्छता एवढेच पहावे. देखभाल भाडेकरुंनी स्वत:चे करावी.

मा. सभापती यांनी शिवशक्ती, तेली गल्ली या इमारतीचा उल्लेख करुन माहीती दिली की, या इमारतीवर मंडळाला देखभालीपोटी रुपये दीड कोटी खर्च येतो. परंतु फक्त एक कोटी रुपये या इमारतीपासून मंडळास मिळतात. अशा इमारतीतील लोकांना सहकारी संस्था स्थापन करण्यास सांगून इमारत जमिनीसकट मोफत द्यावी असाही प्रस्ताव सुकथनकर समितीच्या विचाराधीन आहे. देखभालीच्या संदर्भात मा. सदस्यांनी उपस्थित केलेली तक्रार रास्त आहे कारण मंडळ भाडेकरुंना देखभाल करुन देण्यास बांधील आहे. देखभालीपोटी भाडेकरुंकडून मिळणारी रक्कम ही मंडळास देखभालीवर कराव्या लागणाऱ्या रकमेपेक्षा अतिशय कमी आहे. म्हणून रु. ४५/- ते रु. ६०/- ची भाडेवाढ प्रस्तावित असून निवडणूक व्हावयाची होती म्हणून भाडेवाढ करण्याचे प्रकरण प्रलंबित ठेवले होते. पाणीपट्टीचे मंडळ भाडेकरकडून ३/- रुपये घेते परंतु महानगरपालिकेस मात्र ११.३० रुपये प्रत्येक भाडेकरुसाठी देते. परिस्थिती अशी आहे की, मंडळास शासनाकडूनही पैसे मिळत नाहीत त्यामुळे मंडळाला तोटाच सहन करावा लागतो.

मा. सभापती यांनी अर्थसंकल्पाचा आढावा घेताना असे निदर्शनास आणले की, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात उपकराची रक्कम ३५.१६ कोटी रुपये होती, तीच रक्कम याही वर्षाच्या अर्थसंकल्पात दर्शविण्यात आली आहे.

सुकथनकर समितीच्या असे विचाराधीन आहे की, मंडळाकडे जेवढा उपकर जमतो तेवढी रक्कम किंवा ५० कोटी रुपये यापैकी अधिक असेल ती रक्कम शासनाने मंडळास दिली पाहिजे. विकासक किंवा बिल्डर यांना इमारतीच्या दुरुस्तीसाठी मंडळाने जरी सवलती दिल्या, चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून दिला तरी त्यांच्याकडून पाहीजे तसा प्रतिसाद मिळत नाही, हे ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांच्या संख्येवरून दिसून येईल. त्यामुळे मुख्य जबाबदारी ही मंडळाचीच रहाणार आहे. आणि म्हणूनच सुकथनकर समितीने असे प्रस्तावित करण्याचे ठरविले आहे की, शासनाने म्हाडास ५० कोटी रुपये द्यावेत किंवा जेवढा उपकर गोळा होईल ती रक्कम शासनाने मंडळास द्यावी. त्यांनी पुढे असेही नमुद केले की, घुसखोरांकडून नुकसान भरपाईपोटी सक्तीने दरमहा रु.६००/- गोळा करण्यात येत असल्यामुळे ते पैसे काही लाखामध्ये धरण्यात आले आहेत. जर देखभालीसाठी जास्त पैशांची तरतुद केली आणि भाडेकरुंकडून भाड्यापोटी जमा करण्यात येणारी अपेक्षित रक्कम भाडेकरुंनी न भरल्यामुळे जमा झाली नाही किंवा दुरुस्तीसाठी जास्त रक्कमेची तरतुद करुन ठेवली तर ती करकेल करावी लागेल. मागील अर्थसंकल्पात रुपये दहा कोटी पुनर्रचनेसाठी होते परंतु त्यापैकी फक्त ८ कोटीच रुपये खर्च झाले. १ कोटी रुपये संक्रमण शिबीरसाठी होते परंतु संक्रमण शिबीरे मंडळ बांधत नसल्यामुळे त्यातील फक्त ५० लाख रुपये खर्च झाले. म्हणून उर्वरित रक्कम दुसऱ्या कामासाठी वापरण्यास हरकत नाही. अशाप्रकारे मंडळास पैशांची अंतर्गत तजवीज करता येईल.

मा. सदस्य श्री गोडाबे यांनी असे मत मांडले की, मंडळाचे अस्तित्व नाहीसे व्हावे अशी सदस्याची अपेक्षा नाही. परंतु जोपर्यंत मंडळ अस्तित्वात आहे तोपर्यंत मंडळाने पूर्ण शक्तीनिशी काम केले पाहीजे. त्यांनी असे निदर्शनास आणले की, जेथे जेथे मंडळाची कार्यालये आहेत तेथे सुविधा उपलब्ध नाहीत. त्यासाठी पाठपुरावा केला पाहीजे. घुसखोरांकडून जी वसुली करण्यात येते त्या पैशांचा लाभ इतर कामासाठी केला गेला पाहीजे. म्हणून देखभाल विभाग अस्तित्वात आणला पाहिजे. पुनर्रचित इमारतींच्या गच्चींवर संरक्षणात्मक कठडे बांधण्यात आले पाहिजेत, संक्रमण शिबीरांची दुरुस्ती युध्दपातळीवर केली पाहीजे, गटारे, संडास, नळ, विज यांच्या दुरुस्तीकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघतील यादृष्टीने अडचणी असल्यास शासनाची मदत घेतली पाहिजे, संरचनात्मक कामे करीत असताना असे आढळून येते की, भाडेकरुने किंवा मालकाने घरामध्ये काही फेरफार केलेले असतात, त्यामुळे गळती चालू असते अशा भाडेकरु मंडळाने नोटीस देऊनही दुर्लक्ष करतात. अशाप्रकरणात मंडळाच्या

९८७ २५

अधिका-यांनाच अधिकार देऊन, वेळ पडल्यास अनधिकृत बांधकामे तोडून टाकण्याचे अधिकार मिळाले पाहिजेत. मंडळाचा कारभार प्रभावीपणे व्हावयाचा असेल तर अधिका-यांचे अधिकार वाढविणे योग्य ठरेल व देखभाल विभागाने आपले कार्य कार्यक्षमतेने करावयास पाहिजे. ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रकरणी भाडेकरूंना किंवा विकासकाला अनेक अडचणी येतात व त्यामुळे विलंब होतो. मालक/भाडेकरू/विकासक यांना देण्यात येणा-या सवलतींचे स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे. त्यानंतर संरचनात्मक दुरूस्ती व पुनर्रचनेची कामे करतेल करणे शक्य होईल.

यावर मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, अर्थसंकल्पात कार्यालयातील फर्निचरसाठी वगैरे जी १० लाख रूपयांची तरतुद केली आहे ती वाढवून २५ लाख रूपयांची तरतुद करण्यात येत आहे व तशा सूचना मुख्य लेखा अधिकारी/दुवपु. श्री चौधरी यांना दिल्या.

कार्यवाही
मुलेअ/दुवपु

मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे मत मांडले की, दुरूस्तीच्या कामात दिरंगाई करणा-यावर दर दिवसाला रु. १०/- ते रु. १००/- दंड लावला आहे तो अतिशय कमी आहे असे वाटते. त्यानी पुढे असे निदर्शनास आणले की, ब-याच वेळा ठेकेदार भाडेकरूंना नाहकपणे अडवत असतात, व्यावसायिक लोकांना जागीचपूर्वक ते सांगतात की, काम सहा महीने होऊ शकत नाही आणि त्यांच्याकडून काही गोष्टी ते करून घेत असतात. त्यामुळे ठेकेदारांना देण्यात येणा-या कामांसाठी कालमर्यादा ठरवून देण्यात यावी. जे ठेकेदार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे काम करणार नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. त्यांनी पुढे असे मत मांडले की, गाळ्यांची हस्तांतरणे करण्यासाठीही कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. गाळे हस्तांतरणासाठी आलेल्या अर्जावर किती काळात कार्यवाही करावी याबाबत अधिकारीवर्गास स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. नंतर त्यांनी मागणी केली की, ज्या ८८ वास्तुशास्त्रज्ञांवर कारवाई करण्यात आली आहे त्यांच्या नावांची यादी सदस्यांना देण्यात यावी. पुढे त्यांनी असे मत मांडले की, संक्रमण शिबीर व पुनर्रचित इमारतीतील काही गाळे व्यावसायिक असून ते विक्री करून काही रक्कम देखभालीसाठी वापरण्यात यावी. काही व्यावसायिक गाळे कित्येक वर्षे बंदच आहेत. त्यामुळे दर वर्षी मंडळाला तोटा सहन करावा लागतो. पुनर्रचित इमारतीतील दुकानांची सुध्दा विक्री करून मिळणारी रक्कम फिक्स डिपॉझिटमध्ये टाकून त्यातून काही देखभालीची कामे होतात का ते पहावे.

मा. सदस्य श्री भूवड यांनी कुलाबा संक्रमण शिबीर अस्तित्वात आल्यापासून तेथील काही दुकाने बंदच आहेत. त्या दुकानांच्या विक्रीबाबत पत्रही संबंधितांना दिलेले आहे. दुकानांची विक्री लिलाव पध्दतीने किंवा टेंडर

पध्दतीने करावयास हरकत नाही असे मत व्यक्त करून माहिती दिली की, दुकाने अनेक वर्षे बंद असल्यामुळे अनधिकृत फेरीवाले वाढले आहेत. भाडेकरूंना रेशनिंगसाठी ३-४ कि.मी. लांब जावे लागते. याबाबत मा. गृहनिर्माण मंत्री यांजकडे प्रस्ताव देऊन दोन महीने होऊनही अद्याप त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही. मा. सदस्यांच्या मताशी मा. सभापती यांनी सहमती दर्शवून असे मत मांडले की, कुलाबा संक्रमण शिबीर व सायन संक्रमण शिबीर येथील ८-१० गाळे हे तेथील भाडेकरूंच्या जीवनावश्यक वस्तुंच्या सुविधासाठी बांधलेले आहेत हे खरे आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सुचविले की, हे गाळे भाडयाने द्यावयाचे झाल्यास ते कोणाला द्यावयाचे हा प्रश्न निर्माण होईल. जर तेच विक्रीला काढले तर उच्चतम निविदाकारास ते देता येतील किंवा हे गाळे मालकी हक्काने देण्याचा विचार करावयास हरकत नाही.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, यापूर्वी संक्रमण शिबीरातील दुकाने ही लिलाव पध्दतीने देण्यात आली होती. यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, सदर गाळे बाजारभावाने विकता येणार नाहीत कारण संक्रमण शिबीरे ही आज ना उद्या पुनर्रचित करावीच लागणार आहेत. त्यापेक्षा ज्यांना हे गाळे देण्यात येतील त्यांच्याकडून एक लाख रुपये व्याजाने डिपॉझिट म्हणून ठेवावयाचे व दरमहा भाडे घेऊन त्यांना तीन वर्षे सदर दुकाने चालविण्यास द्यावयाची, म्हणजे तीन वर्षे पूर्ण होण्या आधीच तीन-चार महिने आधी त्या गाळ्यांसाठी पुन्हा निविदा मागवून उच्चतम निविदाकारास गाळे देऊ शकतो.

मा. सभापती यांनी मा. सदस्यांच्या मताशी सहमती दर्शवून पुढील कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी संक्रमण शिबीरातील गाळे कायदेशीर वारसांच्या नावे करण्याचे काम बंद असल्याचे निदर्शनास आणले. यावर मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, संक्रमण शिबीरामध्ये घुसखोरांव्यतिरिक्त काही मुं.गृ.व.क्षे. मंडळाचे लोक रहातात, मंडळाच्या काही कर्मचाऱ्यांची सेवा निवासस्थाने आहेत. संक्रमण शिबीरातील भाडेकरूंच्या जुन्या इमारती पुनर्रचित झाल्यानंतर त्यांना त्या पुनर्रचित इमारतीतील गाळयांची वितरणे करण्यात येतात. पुनर्रचित गाळे वितरणासाठी जे कोणी पुढे येतात त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून पुनर्रचित गाळे विभागामार्फत वितरणे दिली जातात. याबाबत अधिक माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, कायदेशीर अडचण अशी असते की, एखादा भाडेकरू संक्रमण शिबीरात रहावयास गेला, तर ९३ [५] खाली जोपर्यंत त्यांच्या जुन्या इमारतीची जमिन मंडळाच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत तो मूळ मालकाचाच भाडेकरू असतो. त्याने मूळ मालकाला

भाडे भरले पाहीजे. मंडळाला फक्त त्याने देखभालीचा खर्च दिला पाहिजे. भाडेकरूच्या नावे हस्तांतरण केल्यास घरमालक आक्षेप घेण्याची शक्यता आहे की, ज्याच्या नावे हस्तांतरण केले तो माझा भाडेकरू नाही. त्यामुळे पुनर्रचित इमारतीतील गाळ्याचे वितरण घेताना गाळा हस्तांतरण करून घ्यावयाचा असेल असा भाडेकरूने अर्ज करून त्यासा बाबतचे कागदपत्रे सादर करून, हस्तांतरण फी भरून त्याच्या नावे गाळ्याचे वितरण करता येते. परंतु जर जुन्या इमारतीची जमिन मंडळाच्या ताब्यात येऊन त्यावर इमारतीची पुनर्रचना चालू असेल आणि दुर्दैवाने जर मुळ भाडेकरू मृत पावल्यास त्याच्या कायदेशीर वारसाच्या नावे संक्रमण शिबीरातील गाळा हस्तांतर करावयास हरकत नाही.

मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे सुचविले की, संक्रमण शिबीरातील भाडेकरूंची संघटना स्थापन करावी व त्या संघटनेने देखभालीचे काम पहावे व मंडळाने देखभालीसाठी लागणारा खर्च तपासून त्या संघटनेकडे धावा. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, जर यापुढे सात ते आठ मजल्यांच्या इमारती बांधण्यात येणार असतील तर ७० ते ८० लाख रुपयांखेरीज एक कोटीपेक्षाही जास्त खर्च अपेक्षित आहे. अर्थसंकल्पातील तरतुद पहाता मुंबईत फक्त १० ते ११ पुनर्रचित इमारतीच होणार काय अशी विचारणा करून पुनर्रचित इमारती करण्यासाठी तरतुद वाढविण्याबाबत विचार करावा असे त्यांनी सुचविले.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, पुनर्रचनेसाठी अर्थसंकल्पात तरतुद वाढवून फायदा होईलच असे नाही. कारण पुनर्रचनेचा कार्यक्रम हा मंडळाच्या ताब्यात येणारे भूखंड, मंजूर होणारे प्लॅन, कलम ९३ खाली संपादित करण्यात येणाऱ्या जमिनी यांच्या संख्येवर अवलंबून असतो. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात पुनर्रचनेसाठी १२ कोटीची तरतुद असूनही ४ कोटी रुपये खर्च केले गेले नाहीत.

मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाकडे सध्या इतक्या जमिनी उपलब्ध आहेत की, मंडळ दहा वर्षाचा पुनर्बांधणी कार्यक्रम राबवू शकते. बाबला कंपाऊंडसारखा प्रकल्प जरी पुनर्रचनेसाठी मंडळाने घेतला तरी एका वर्षाचे बजेट आपण पूर्ण करू शकतो.

वरील चर्चेनंतर मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनांपैकी दुरुस्ती कामात होणाऱ्या दिरंगाईबद्दल ठेकेदारास दर दिवशी रु. ५०/- ते रु. २००/- दंड आकारण्यात यावा व तसे परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करणे तसेच कारवाई करण्यात आलेल्या ८८ वास्तुशास्त्रज्ञांची यादी सन्मा. सदस्यांना उपलब्ध करून देण्यात यावी, ह्या सूचना मान्य करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

३१२

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी मांडण्यात आलेला अर्थसंकल्प हा शिल्लकी अर्थसंकल्प असल्याने अभिनंदन करुन त्यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरातील गटार लाईन, शौचालये इत्यादी दुरुस्तीसाठी जाने.१९९७ पर्यंत मंडळाने ४ कोटी ७८ लाख खर्च केलेले आहेत परंतु दुरुस्ती कामांचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे. त्यामुळे एवढा खर्च करुन त्याचा परिणाम दिसून येत नाही. म्हणून सदर कामांची पुन्हा तपासणी करण्यात यावी तसेच मागील आठ महिन्यांपासून संक्रमण शिबीरात जी कामे सुरु झालेली आहेत ती अजूनही पूर्ण झालेली नसून अर्धवट स्थितीत पडून आहेत. यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, शासनाकडून १० कोटी रुपये या दुरुस्ती कामांसाठी मिळणार होते. ते न मिळाल्याने वरील कामे अर्धवट सोडून द्यावी लागली आहेत. तरीही चार-साडेचार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी पुढे असे सूचित केले की, सदर कामांची फेर तपासणी व्हावी. तसेच बृहत्सूचीवर ~~भाडेकरूं/रहिवाशांची नांवे~~ घेण्यासाठी मंडळाच्या विभागीय कार्यालयांकडून उपमुख्य अधिकारी [पु.गा.] यांच्याकडे काही इमारतींची यादी पाठविण्यात आली होती. परंतु उपमुख्य अधिकारी [पु.गा.] यांच्या म्हणण्याप्रमाणे विभागीय कार्यालयांकडून भाडेकरुंची नावे व त्यांच्या खोल्यांचे क्षेत्रफळ कळविण्यात आलेले नाही व तसा तपशील कळविण्यासाठी त्या कार्यालयांकडे सतत पाच महीने पाठपुरावा करुनही आवश्यक ती माहीती न मिळाल्यामुळे सदर भाडेकरुंना बृहत्सूचीत समाविष्ट करता आलेले नाही. मा. सदस्यांनी पुढे अशीही माहिती दिली की, भाडेकरुंची अशी अवस्था आहे की, त्यांच्या इमारतींचे नक्की काय होणार आहे? मंडळाकडून भाडेकरुंना पत्रे गेली आहेत की, तुमची इमारत पुनर्रचित होणार नाही. त्या पत्रांच्या आधारे सदर भाडेकरु बृहत्सूचीत समाविष्ट करण्याबाबत मंडळास सांगतात. परंतु उपमुख्य अधिकारी [पु.गा.] सांगतात की, भाडेकरुंची यादी विभागीय कार्यालयांकडून मिळत नसल्याने त्यांची नावे बृहत्सूचीत समाविष्ट करता येत नाहीत.

मुअ [illegible]
उमुअ [पुनर्र]
उमुअ [पु.गा.]

यावर मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] व उपमुख्य अधिकारी [पु.गा.] यांना सूचना दिल्या की, १५ ते २० दिवसात हा प्रश्न निकाली काढण्यात यावा व बृहत्सूचीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील तीन-चार बैठकांपासून गाळे हस्तांतरण प्रक्रीया चालू करण्यात येत आहे असे सांगण्यात येते. परंतु अजूनही गाळे हस्तांतरण प्रक्रिया चालू करण्यात आलेली नाही. मंडळाचा महसूल वाढण्यासाठी गाळे हस्तांतरण प्रक्रिया लवकरात लवकर चालू करणे आवश्यक आहे.

३२

यावर मुख्य अधिकारी यांनी गाळे नियमितीकरण योजना सुरू झालेली असून आतापर्यंत ८०० अर्ज प्राप्त झालेले आहेत अशी माहिती देऊन सदर प्राप्त झालेल्या अर्जांवर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना उपमुख्य अधिकारी [मु.गा.] यांनी दिल्या आहेत.

मा.सभापती यांनी उपमुख्य अभियंता [उत्तर] यांना सूचना दिल्या की, जी कामे निकृष्ट दर्जाची केलेली आहेत त्या कामांबाबत तपासणी करून काही अयोग्य आढळल्यास जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता श्री भूवनदास यांना मा. सदस्यांनी निर्देशित केलेली संक्रमण शिबीरातील निकृष्ट कामांबाबत त्यांनी खुलासा द्यावा अशी सूचना केली. त्याप्रमाणे खुलासा करताना श्री भूवनदास यांनी सांगितले की, गोरेगांव, मागाठाणे, प्रतिक्षानगर या संक्रमण शिबीरातील करण्यात आलेली कामे समाधानकारक झालेली आहेत. फक्त सायन संक्रमण शिबीरातील संडासांचे जे दरवाजे बनविण्यात आलेले आहेत ते सदोष असल्याने त्यात सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मा.सभापती यांनी सूचना केली की, श्री भूवनदास,[उ.मु.अभि.] यांनी मा.सदस्यांबरोबर संक्रमण शिबीरास भेट देऊन सदस्यांच्या तक्रारीप्रमाणे जर कामे निकृष्ट दर्जाची झाली असतील तर संबंधित कार्यकारी अभियंता/ उपअभियंता यांचा खुलासा मागवावा.

मा.सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी असे मत व्यक्त केले की, मुख्य अधिकारी यांनी छोटी छोटी किरकोळ देखभालीची कामे भाडेकरूंनी स्वतःच करावीत ही सूचना रास्त आहे.

मा.सदस्य श्री मोडक यांनी अशी सूचना केली की, मुंबई शहरात मंडळाच्या ताब्यात बऱ्याचशा जागा आहेत. मातुल्य मिल कंपाऊंडची जागाही मंडळाच्या ताब्यात असून तेथे मंडळाने संक्रमण शिबीर बांधून त्यातील गाळे मोडकळीस आलेल्या इमारतीतील लोकांना पर्यायी जागा म्हणून देण्यात याव्यात. त्यामुळे मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण होणार नाही. तसेच पुनर्रचित इमारतींच्या देखभालीवर मंडळाने लक्ष द्यावे, तसेच बृहत्सूचीवरील लोकांना लवकरात लवकर गाळे वितरीत करण्यात यावेत.

सविस्तर प्रदीर्घ चर्चेअंती मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार सन १९९६-९७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९७-९८ चे अर्थसंकल्पीय शिलकीचे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्र. ९२/३३६
===============

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन १९९६-९७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक रु. ८००७.५१ लाख जमा व रु. ७३१३.३३ लाख अपेक्षित खर्चासहीत ६९४.१८ लाखाच्या शिलकी अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

xxxxxxxxxxxx

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

गुरुवार दिनांक- ६ मार्च १९९७ रोजी झालेल्या मंडळाच्या नियमित ४२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

.........

दुपारच्या भोजनानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या ४२ व्या बैठकीस आरंभ करण्यात आला. बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती यांनी नुकत्याच पार पडलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत वॉर्ड क्र. १९ मधून नगरसेवक म्हणून चांगल्या मतांनी निवडून आलेले युतीचे उमेदवार श्री अनंत पालकर यांचे सर्वांच्या वतीने अभिनंदन करुन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व मुंबईसारख्या अग्रगण्य शहरातील जनतेची सेवा करण्याची उत्तम संधी श्री पालकर यांना लाभलेली असून मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहाच्या ज्ञानमध्ये ते भर घालतील अशी मा. सभापती यांनी त्यांना जबाबदारीची जाणीव करुन देऊन श्री पालकर यांची कारकीर्द चांगली जाओ अशा सर्वांच्यावतीने शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री एम. एम. पाटकर हे मंडळामधील ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त होत असल्याबद्दल मा. सभापती यांनी सर्वांच्या वतीने श्री पाटकर यांच्या सेवेचा गौरव करुन त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व उर्वरित आयुष्य त्यांना सुखाचे, शांतीचे जाओ अशा सर्वांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त केल्या. नंतर सचिव श्री गद्रे यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या.

सचिव श्री गद्रे यांनी उपस्थित सर्व सन्मा. मान्यवरांचे स्वागत करुन ४२ व्या बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ४२/१.

विषय- मंडळाची दि. २१. १२. ९६ रोजी झालेल्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

मंडळाची दि. २१. १२. ९६ रोजी झालेल्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ. क्र. १ ते ७१ वर सादर करण्यात आला आहे. मा. सदस्य श्री प्रकाश भूवड यांनी अशी सूचना केली की, पृ. क्र. ५ वर " मंडळाचे तीन सदस्य सर्वश्री दगडू सकपाळ, विनोद घोसाळकर व प्रकाश भूवड यांना युवकप्रमुख म्हणून पदे मिळाल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडला." असे जे चुकीचे लिहिले आहेत त्यात बदल करुन " मंडळाचे तीन सदस्य सर्वश्री दगडू सकपाळ,

विनोद खोपकर व प्रकाश भूमड यांना "विभाग प्रमुख, सहायक पदे मिळाल्याबद्दल मंडळातर्फे अभिनंदन करण्याचा ठराव मांडला " असे नोंदविण्यात यावे. यावर मा. सभापती यांनी मा. सदस्यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवृत्तात [illegible] सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पृ. क्र. ३७ वरील डी-२ विभागातील इ. क्र. ६-८, [illegible] लेन, गांधी भुवन, डॉ. [illegible] मार्ग या इमारतीस ८८[३]अ अंतर्गत प्रमाणपत्र देण्याचे मंजूर केले होते. परंतु त्याची ठरावामध्ये नोंद घेण्याचे नजरचुकीने राहून गेल्याने सदर प्रस्तावास मंजूरी दिल्याची नोंद घेण्याच्या सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. २१. १२. ९६ रोजी झालेल्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

---

ठराव क्रमांक ४२/२.

विषय- अनुपालन अहवाल [दक्षिण परिमंडळ]
सी-३/सी-४ विभागातील दि. २१. १२. ९६ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यात आलेल्या अंदाजपत्रकांबाबतचा अनुपालन अहवाल.

.........

उपरोक्त अनुपालन अहवाल पृ. क्र. ७३ ते ७५ वर सादर करण्यात आला आहे. याबाबत मा. सभापती यांनी सूचना केली की, कोणतेही अंदाजपत्रक तयार करताना " नॉन स्ट्रक्चरल आयटेम" बाबत कार्यकारी अभियंता समाधानी असतील तर त्यांनी प्रस्तावामध्ये "प्रस्ताव योग्य आहे" असे स्पष्ट लिहून प्रस्ताव मंडळासमोर सादर करावा. सविस्तर चर्चेअंती सी-३/सी-४ विभागातील मंजूरीसाठी ठेवण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा अनुपालन अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४२/३३७ .

दक्षिण परिमंडळातील सी-३/सी-४ विभागाची दि. २१. १२. ९६ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा अनुपालन अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---

ठराव क्रमांक : ४२/३ .

विषय- पुनर्बांधणी विभाग.

१] कार्यकारी अभियंता, पु. वि. [३] मधील खालील पुनर्रचित इमारतींना नाव देण्याचा प्रस्ताव.

----

४१

विषय- अ] मिठाईवाला चाळ क्र. ३ व ४, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

ब] बारा चाळ क्र. ४, ६, ७, सेनापती बापट मार्ग, लोअरपरेल, मुंबई.

क] १०बी, सी. डी. जुनी कुंभार चाळ, फितवाला रोड, एलफिन्स्टन, मुंबई.

---

मा. सभापती यांनी उपरोल्लेखित प्रस्तावांबाबत माहीती देऊन सांगितले की, इमारतींना नांव देण्याच्या तिन्ही प्रस्तावांना त्या त्या जुन्या इमारतींच्या रहिवाशांच्या समितीची मान्यता असल्यामुळे सदर प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. तरी काकासाहेब गाडगीळ मार्गावरील मिठाईवाला चाळ क्र. ३ व ४ हया पुनर्रचित इमारतीस " नंदनवन " तसेच सेनापती बापट मार्गावरील बारा चाळींस "तपोवन-अ, ब, क. व जुनी कुंभार चाळ, १०-बी. सी. डी, फितवाला रोड हया इमारतीस " नालंदा निवास" अशा नांवांस सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४२/३३८.

खालील पुनर्रचित इमारतींच्या नावांच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[अ] मिठाईवाला चाळ क्र. ३ व ४, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई या पुनर्रचित इमारतीस " नंदनवन", असे नांव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ब] बारा चाळ क्र. ४, ६, ७, सेनापती बापट मार्ग, लोअरपरेल, मुंबई हया पुनर्रचित इमारतीस " तपोवन- अ, ब, क. " हे. नांव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[क] १०, बी. सी. डी. जुनी कुंभार चाळ, फितवाला रोड, एलफिन्स्टन रोड, मुंबई हया पुनर्रचित इमारतीस " नालंदा निवास" हे नांव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

बाब क्रमांक : ४२/४.

विषय- स्थानिक विकास कार्यक्रम १९९६-९७ निधी वितरणाबाबत.

---

उपरोक्त विषयाची बाब टिपणी सन्मा. सदस्यांच्या माहीतीकरिता

पृ.क्र. ८३ ते ८७ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावाची माहीती मा.सभापती यांनी दिल्यानंतर सर्वानुमते त्याची नोंद घेण्यात आली.

---

बाब क्रमांक : ४२/५.

विषय- पुनर्रचित इमारतीमधील घुसखोरांनी व्यापलेल्या गाळ्याचे न्यायालयीन/सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा दि.२२.१.९७ रोजीपर्यंतचा गोषवारा.

---

विषयांकित अहवाल सर्व सन्मा.सदस्यांच्या माहीतीसाठी पृ.क्र.८९ ते ९५ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाबाबत बोलताना मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत १९८९- ते १९९५ या कालावधीत न्यायालयात कोणती व किती प्रकरणे आहेत याची माहीती बैठकीत ठेवण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे माहीतीसाठी सदर प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. चर्चेअंती सदर प्रस्तावाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

---

बाब क्रमांक : ४२/६.

विषय- संक्रमण शिबीरातील दि.३१.१२.९६ पर्यंत रिक्त/घुसखोर/गाळ्यांची माहीती दर्शविणारा तक्ता.

---

विषयांकित अहवाल सर्व सन्मा.सदस्यांच्या माहितीकरिता पृ.क्र. ९७ वर सादर करण्यात आला आहे. यावर मा.सदस्य श्री प्रकाश भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, प्रस्तावात दर्शविण्यात आलेली माहिती चुकीची आहे. कारण त्यांनी संक्रमण शिबीरात १४३ घुसखोरांची यादी दिली होती. यावर उपमुख्य अधिकारी [सं.गा.] श्री मोरे यांनी खुलासा केला असता सदस्यांनी अनधिकृत व घुसखोर व्यक्ती यात फरक काय? अशी विचारणा केली. यावर मुख्य अधिकारी यांनी माहीती दिली की, ज्या सदनिकेचे वितरण मंडळामार्फत केले नाही, अशा सदनिकेमध्ये जर कोणी रहावयास आले तर त्याला घुसखोर म्हणून संबोधतात. परंतु ज्यांना गाळ्याचे वितरण मंडळामार्फत केले आहे, त्या लोकांनी जर मंडळाची परवानगी न घेता इतर कोणालाही जागा दिली असेल

तर त्या व्यक्तीला अनधिकृत व्यक्ती म्हणून संबोधण्यात येते. मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, ज्या सदनिकाचे वितरण केलेले नाही त्या जागेत जर कोणी रहात असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरात असेही लोक रहातात की, त्यांच्या जुन्या इमारतींची दुरुस्ती पूर्ण झालेली असून मुळ इमारतीतील जागेचा ताबा घेतला आहे. तरीही संक्रमण शिबीरातील गाळयाचा अनधिकृतपणे वापर करीत आहेत. यावर मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, अशाप्रकरणी त्या व्यक्तींना घुसखोर म्हणून समजून जेव्हापासून त्यांना मूळ इमारतीतील जागेचा ताबा दिलेला आहे तेव्हापासून त्यांच्याकडून दंडात्मक रक्कमेची आकारणी करुन गाळयाच्याबाहेर त्यांना काढण्यात यावे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, काही व्यक्तींनी मुळ इमारत दुरुस्त झाल्यानंतर तेथील गाळयांचा ताबा घेऊन ते रहावयास गेलेले आहेत परंतु संक्रमण शिबीरात त्यांना दिलेल्या गाळयांत त्यांनी पोटभाडेकरु ठेवलेला आहे. अशीही प्रकरणे घुसखोरीचीच समजण्यात यावीत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणून दिले की, काही व्यक्तींनी इमारत पुनर्रचित झाल्यानंतर त्या इमारतीतील गाळयांचा ताबा घेतलेला आहे. संक्रमण शिबीरातील गाळयांचा ताबा त्यांनी भाडेवसुलीकाराकडे दिलेला आहे परंतु मंडळाच्या दप्तरी मात्र गाळा सुपूर्द केल्याची नोंद नाही. तर तो त्याच भाडेकरुच्या नावावर आहे.

वरील चर्चेनंतर मा. सभापती यांनी सदस्यांना विनंती केली की, अशा प्रकारची उदाहरणे त्यांनी मुख्य अधिकारी व सभापती यांजकडे द्यावीत म्हणजे संबंधित भाडेवसुलीकाराला खोटा रिपोर्ट दिल्याचे निदर्शनास आल्यास कारवाई करता येईल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, इमारतीच्या दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त दोन वर्षे लागतात. परंतु त्यांच्या माहीतीतील महंमद अली रोडवरील तसेच इ वॉर्डमधील काही लोक अजूनही बांद्रा संक्रमण शिबीरातच रहात आहेत. त्यांच्या इमारतींची दुरुस्ती होऊन त्या इमारतीत ते रहावयास गेलेले आहेत व संक्रमण शिबीरातील गाळे त्यांनी भाडयाने दिलेले आहेत किंवा मुळ इमारतीतील गाळे त्यांनी भाडयाने दिलेले आहेत व संक्रमण शिबीरात ते स्वत: रहातात. अशाप्रकारे दोन्ही गाळयांचा वापर ते करीत आहेत. तरी त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, अशा प्रकरणांची यादी त्यांनी मागेच दिलेली आहे. परंतु कोणतीही कार्यवाही झालेली नाही. ६-७ महिन्यांपूर्वी त्यांनी जवळ जवळ १५० लोकांची यादी दिली होती त्यापैकी फक्त १०-२० लोकांना संक्रमण शिबीरांतून काढून टाकले. बाकी लोक अजूनही तसेच आहेत. यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अधिकारी [सं. गा. ] श्री मोरे यांना सूचना दिल्याकी, सदस्यांनी दिलेल्या तक्रारींकडे गंभीरपणे लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी तसेच सन्मा. सदस्यांना त्याची पोच द्यावी.

---

बाब क्रमांक : ४२/७ .

विषय- दक्षिण परिमंडळ.

१ ] उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीचे सुधारित कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

२ ] इ. क्र. ३३सी, मुगभाट क्रॉस लेन या इमारतीस ८८ [३] अ, प्रमाणपत्रा प्रदान करणे.

---

उपरोक्त विषयाचे प्रस्ताव पृ. क्र. ९९ ते १३१ व १३३ ते १३७ वर सादर करण्यात आले आहेत.

वरील विषयाबाबत माहीती देताना सचिव श्री गद्रे यांनी सांगितले की, पूर्वी जी अंदाजपत्रके मंजूर झाली होती ती १९९१-९२ च्या शेडयूल ऑफ रेट प्रमाणे होती. सादर अंदाजपत्रकांना मंडळाने प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम जी लागणार आहे त्यासाठी पुन्हा मंडळाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी बाब ठेवलेली आहे. त्यामुळे जरी ही अंदाजपत्रके सुधारित असली तरी ती प्रचलित दरावरच सुधारित करण्यात आली आहेत. सचिव यांच्या वरील खुलाशानंतर सादर करण्यात आलेली दक्षिण परिमंडळाची अंदाजपत्रके मंजूर करण्याचे तसेच इ. क्र. ३३ सी, मुगभाट क्रॉस लेन या इमारतीस ८८ [३] अ, प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ४२ / ३३९

दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट-अ मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीचे सुधारित कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान

करण्यात तसेच इ. क्र. ३३सी, मुगभाट क्रॉस लेन या इमारतीस ८८[३]-अ प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

बाब क्रमांक : ४२/८ . - [उत्तर परिमंडळ]

विषय- इ. क्र. ११-२१, दगडी बिल्डिंग, अनंत मालवणकर मार्ग, मुंबई ह्या इमारतीस ८८[३]अ प्रमाणपत्र प्रदान करणे.

---

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ. क्र. १३९ ते १४७ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, इ. क्र. ११-२१, दगडी बिल्डिंग, अनंत मालवणकर मार्ग, मुंबई ह्या इमारतीच्या रहिवाशांनी अतिरिक्त लागणारे पैसे भरू शकत नाहीत असे कळवून एक वर्ष झाले आहे. मग ८८[३] अ, जाहीर करावयास इतका विलंब का लागला? अशी विचारणा करुन संबंधित अधिका-यांचा याबाबत खुलासा मागवावा अशा सूचना दिल्या. व चर्चेनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ४२/३५०

उत्तर परिमंडळातील इमारत क्र. ११-२१, दगडी बिल्डिंग, अनंत मालवणकर मार्ग, मुंबई ह्या इमारतीच्या ८८[३]अ प्रस्तावास चर्चे अंती सर्वानुमते मान्यता देण्यात आली व ८८ [३]अ जाहीर करण्यास विलंब लावल्याबाबत संबंधित अधिका-यांचा खुलासा मागविण्यात यावा असे ठरले.

---

-:- मा. अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात येणारे आयत्यावेळचे विषय.

विषय- [१] इ. क्र. १७५, महालक्ष्मी बिल्डिंग, या नांवाने ओळखल्या जाणा-या सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी येथील भूखंड व त्यावरील इमारतीच्या नियोजीत महालक्ष्मी संस्थेस संपादन करण्यास प्रस्ताव.

---

मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपरोक्त म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम १०३ [ब] चा प्रस्ताव सर्व सन्माननीय सदस्यांना

मंजूरीसाठी सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाची मा. सभापती यांनी संक्षिप्त माहीती दिल्यानंतर सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

ठराव क्रमांक : ४२/३४१
=====================

इमारत क्र. १७५, महालक्ष्मी बिल्डिंग, सर भालचंद्र रोड, हिंदु कॉलनी येथील भूखंड व त्यावरील इमारतीच्या नियोजित महालक्ष्मी संस्थेस संपादन करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

[२] विषय- इ. क्र. १२, फॉकलंड रोड, ९वी गल्ली, "राबिया बिल्डिंग " या इमारतीच्या तिसऱ्या व चौथ्या माळयांच्या संरचनात्मक दुरूस्ती व व्हेकेशन नोटीस. याबाबत मार्गदर्शनासाठी सादर.

---

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना मार्गदर्शनार्थ सादर करण्यात आली. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी राबिया बिल्डिंग बाबतचा तिसऱ्या व चौथ्या माळयाच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या कामाची सविस्तर माहीती दिली. यावर मा. सदस्य श्री अनंत पालकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, १९७८ ते १९८० या कालावधीमध्ये सदर इमारतीचे तिसरा व चौथा माळा अनधिकृतपणे बांधण्यात आले आहेत. हीबाब गेल्या २० वर्षात कोणाच्याही लक्षात आली नाही का? येथे अनधिकृत बांधकाम करण्यात आली आहेत, अशा कामांना मान्यता द्यावयाची किंवा कसे ? अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, या अनधिकृतपणे बांधलेल्या मजल्यांना महानगरपालिकेने मान्यता दिली आहे किंवा नाही हे पहावे लागेल. मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, जर या इमारतीच्या उपकराची [सेस] वसुली जर फक्त तळ+ वरचे दोन मजले एवढयापुरतीच होत असेल तर मग हया अनधिकृतपणे बांधलेल्या दोन मजल्यांचा दुरूस्ती उपकर सुध्दा त्यांनी भरावयास पाहीजे. जर इमारतीच्या दुरूस्तीच्या कामामध्ये जर आपण हया तिसऱ्या व चौथ्या माळयांचा बिल्टअप एरिया धरणार आणि हया दोन्ही माळयांचा दुरूस्ती उपकर जर भरला नसेल तर ते योग्य नाही. म्हणून [illegible] घालण्यात यावी की, जे दोन मजले वाढविलेले आहेत त्यांचा दुरूस्ती उपकर

त्यांनी ते मजले बांधल्यापासून त्या इमारतीच्या संपूर्ण थकबाकीसह महानगर पालिकेकडे भरल्यानंतर दुरूस्तीचे काम चालू करण्यात येईल.

मुख्य अधिकारी यांनी मांडलेल्या वरील मताशी सर्व सन्मा. सदस्यांनी व मा. सभापती यांनी सहमती दर्शवून सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४२/ ३४२.

इमारत क्र. १२, फॉकलंड रोड, ९वी गल्ली, राबिया बिल्डिंग या इमारतीच्या तिसऱ्या व चौथ्या माळ्याची संरचनात्मक दुरूस्ती व व्हेकेशन नोटीस बाबतच्या प्रस्तावास सविस्तर चर्चेअंती सदर तिसऱ्या व चौथ्या माळ्याचे दुरूस्ती उपकर सदर माळे बांधल्यापासून महानगरपालिकेकडे भरल्याच्या पावत्या सादर करण्याच्या अटीस आधीन राहून सदर इमारतीच्या दुरूस्तीस मान्यता देण्यात आली.

---

[३] विषय- मुंबई बेटावरील "अ" वर्गातील जुन्या उपकर पात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी घरमालक विकासक यांनी सादर केलेले प्रस्ताव.

[अ] भूकर पहाणी क्र. ६९४, माजगांव विभाग, इ. क्र. १०-१४ आणि ३६-४० सेलेक्स रोड, [दादोजी कोंडदेव मार्ग] इ. विभाग येथील हिंगवाला काचवाला चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेस ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत.

[ब] भूकर पहाणी क्र. २९८, परळ-शिवडी विभाग, इ. क्र. ७६ व ७६ अ, परळ व्हिलेज, फ/दक्षिण विभाग, मुंबई येथील "पुरव निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत.

[क] अंतिम भूखंड क्र. १६७, नगररचनायोजना क्र. २६[दोन] माहीम विभाग, उपकर क्र. जीएन ४७५५[१], इ. क्र. ३५-३७, शितलादेवी मंदिर मार्ग, माहीम, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

विषय- [ड] भूकर पहाणी क्र. ५३५, माटुंगा विभाग, इ. क्र. १७-१७ अ, लक्ष्मी नारायण लेन, फ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई. येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

[इ] अंतिम भूखंड क्र. १२४५, नगररचना योजना क्र. ४ [चार] माहीम विभाग, उपकर क्र. जी-२५४३, [१एसी/१००डी, प्रभादेवी रोड, ग/दक्षिण विभाग येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

[ई] अंतिम भूखंड क्र. ६४१, नगररचना योजना क्र. ४[चार], माहीम विभाग, उपकर क्र. जी-४६४२ [२-अ] ६, कॅडेल रोड व रानडे रोड, दादर[पश्चिम], मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

[उ] भूकर पहाणी क्र. ११२१, गिरगांव विभाग, इ. क्र. ३२५, मौलाना शौकत अली मार्ग, डी. विभाग, मुंबई जाफर मॅन्शन या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

---

उपरोक्त सातही प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांच्या अवलोकनार्थ व मंजूरीसाठी सर्वांना सादर करण्यात आले. सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, जे ७ प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत त्यातील अटींची पूर्तता केलेली असल्यामुळे ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नाही असे मत व्यक्त केले.

चर्चेअंती वरील सातही प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४२/३४३

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या खालील सातही प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली.

[अ] भूकर पहाणी क्र. ६२४, माजगाव, विभाग, इ. क्र. १०-१४, आणि ३६-४० ससेक्स रोड [दादोजी कोंडदेव मार्ग, इ. विभाग येथील हिंगवाला कापवाला चाळ.

[ब] भूकर पहाणी क्र. २१८, परळ-शिवडी विभाग, इ. क्र. ७६ व ७६-अे, परळ व्हिलेज, फ/दक्षिण विभाग, मुंबई येथील सुरव निवास.

[क] अंतिम भूखंड क्र. १६७, नगररचना योजना क्र.२६ [दोन] माहीम विभाग, उपकर क्र.जीएन ४७४५ [१], इ.क्र. ३५-३७, शितलादेवी मंदिर मार्ग, माहीम, मुंबई.

[ड] भूकर महाणी क्र. ५३५, माटुंगा विभाग, इ.क्र. १७-१७ अ, लक्ष्मी नारायण लेन, फ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई.

[इ] अंतिम भूखंड क्र. १२४५, नगररचना योजना क्र. ४ [चार] माहीम विभाग, उपकर क्र. जी-२५४३ [१एसी/१००डी, प्रभादेवी रोड, ग/दक्षिण विभाग.

[ई] अंतिम भूखंड क्र. ६४१, नगररचना योजना क्र. ४ [चार], माहीम विभाग, उपकर क्र. जी-४३४२ [२-अे], ६, कॅडेल रोड व रानडे रोड, दादर [पश्चिम], मुंबई.

[उ] भूकर महाणी क्र. ११२१, गिरगांव विभाग, इ.क्र. ३२५, मौलाना शौकत अली मार्ग, डी. विभाग, मुंबई. झाकर मॅन्शन.

---

—: पुरवणी कार्यसूची :—

दक्षिण परिमंडळ.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने दक्षिण परिमंडळाची पूरवणी कार्यसूची सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आली.

[अ] इ.क्र. ८, बोरभाट लेन, प्रशासकीय मान्यतेवरील जादा खर्चास मान्यता मिळणेबाबत.

[ब] इ.क्र. ३६९, ३७५, मौलाना शौकत अली रोड या इमारतीच्या दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

[क] इ.क्र. १५०, कुलाबा रोड, या इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्ती कामासाठी पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव लागणाऱ्या खर्चास मंजूरी मिळण्याबाबत.

वरील तिन्ही प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन इमारतीच्या दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्रस्तावित केल्याप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

[ड] <u>उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या नवीन कामांच्या अंदाजपत्रकाबाबत.</u>

"बी" विभागातील आणि "सी" विभागातील धोकादायक इमारतींना तातडीच्या दुरूस्तीची आवश्यकता असल्याने त्यांस खास बाब म्हणून मंडळापुढे मंजूरीसाठी ठेवण्यासाठी मुख्य अधिकारी यांची मान्यता घेण्यात आली असून सदर कामाच्या निविदा मागविण्याची परवानगी संबंधित कार्यकारी अभियंता यांना देण्यात आली आहे.

३३५

५८.

"डी. विभाग"

[१] इ. क्र. १७२, झकेरिया मस्जिद रोड,

[२] इ. क्र. १२०-१२२, निशानपाडा रोड,

[३] इ. क्र. ११५, झकेरिया मस्जिद रोड.

"ती. विभाग."

[४] ४८३/४८७, फॉकलंड रोड,

[५] ९९, काझी स्ट्रीट.

वरील पाचही प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. सविस्तर चर्चेअंती वरील पाचही प्रस्तावांना मान्यता सर्वानुमते देण्याचे ठरले.

[इ] दक्षिण परिमंडळातील "अ" "ब" "सी-१/सी-२" "सी-३/ती-४" "डी-१/डी-२" विभागातील अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव पृ. क्र. ५१ ते २२९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते सदर प्रस्तावांना मान्यता देण्याचे ठरले.

[ई] उत्तर परिमंडळातील "ई-१/ई-२" "फगद" "फउ/दउ विभागातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव.

उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव पृ. क्र. १ ते १०६ वर पुरवणी कार्यसूची अंतर्गत सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे ठरले. चर्चेच्या ओघाओघात मुख्य अधिकारी यांनी माहीती दिली की, दुरुस्तीची अंदाजपत्रके तपासणीचे काम पूर्वी निवासी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात केले जात असे. परंतु त्यांच्याकडे कामाचा बराचसा ताण असल्यामुळे दोन आठवडयांपासून कार्यकारी अभियंता/सहकारी संस्था कक्ष यांच्याकडे दुरुस्तीचे प्रस्ताव उपमुख्य अभियंता [दक्षिण] [उत्तर] यांच्याकडून तपासणीसाठी पाठविण्यात येत आहेत. त्या कामाची जबाबदारी त्यांच्यांवर टाकण्यात आली आहे.

-----

ठराव क्रमांक :४२/ ३४४.

सविस्तर चर्चेअंती खालील प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[अ] इ.क्र.८, बोरबाट लेन, प्रशासकीय मान्यतेवरील जादा खर्चास मान्यता देणेबाबत,

[ब] इ.क्र.३६९, ३७५ : मौलाना शौकत अली रोड या इमारतीच्या दुरूस्ती-साठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

[क] इ.क्र.१५०, कुलाबा रोड, या इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्ती कामा-साठी पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव लागणाऱ्या खर्चास मंजूरी मिळण्याबाबत.

[ड] बी. आणि सी. विभागातील पाच मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या नवीन कामांच्या अंदाजपत्रकाबाबत.

[इ] दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्ती कामाच्या "परिशिष्ट-ब" मधील सर्व अंदाजपत्रकांना सविस्तर चर्चेअंती मान्यता देण्यात आली.

[ई] उत्तर परिमंडळातील दुरूस्ती कामाच्या "परिशिष्ट - क" मधील सर्व अंदाजपत्रकांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

पूर्तता उअ/पुगा

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, वैधकीय कारणांवरून गाळा बदलून देण्याचे मंडळाने ठरविले होते. त्याबाबत पुढे काय झाले? यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सदर विषयाबाबत सर्वकष प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी परळ व्हिलेज येथील कच्चुवाणी चाळी बाबत काय झाले अशी विचारणा केली असता मा. सभापती यांनी सदर इमारती बाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना दिल्या.

मा. सभापती यांनी माहीती दिली की, पावसाळयापूर्वीच्या सर्वेक्षणाचे काम चालू आहे. जर कोणा मा. सदस्यांच्या असे लक्षात आले की, एखादी इमारत धोकादायक आहे व ती पावसाळयापूर्वी पडण्याची शक्यता आहे, तर त्यांनी अशा इमारती मंडळाच्या निदर्शनास आणून घाव्यात. तसेच इमारत धोकादायक झाल्यामुळे ती खाली करणे आवश्यक आहे असे ज्या इमारतींवर बोर्ड लावले असतील अशा इमारतीतील रहिवाशांना त्यांनी स्वत:हून खोल्या खाली केल्या नाहीत तर जबरदस्तीने त्यांच्या खोल्या खाली केल्या जातील.

मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी २० जाने. १९९७ च्या महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये दाद फिर्याद या सदरामध्ये भवानी शंकर रोडवरील

सिध्दी चाळ क्र. ३, ५, ७ या इमारतीबाबत जी बातमी छापून आली होती ती सभागृहात वाचून दाखविली.

यावर मा. सभापती यांनी सदर कात्रणाची प्रत मुख्य अधिकारी व सभापती यांना देण्यात यावी व बातमीतील विषयाबाबत संबंधितांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत मांडले की, वर्तमानपत्रात छापून येणा-या मंडळा बाबतच्या बातम्यांबाबत सर्व संबंधित अधिकारीवर्गाने त्वरित कार्यवाही करावी.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची नोंद घेऊन कार्यवाही करावी अशा सूचना सर्व अधिकारी वर्गास देऊन सर्व सन्मा. सदस्यांचे व अधिकारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक समाप्त झाल्याचे घोषित केले.

सही/-
मु. अ. /दुवपु.

सही/-
सभापती/दु. दु. पु.

दिनांक ६.३.९७ रोजी झालेल्या ४२ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांची यादी परिशिष्ट -"अ"

| अ. क्र. | इमारतीचे नांव | विभाग | दुरुस्तीचा टप्पा | एकूण अंदाज पत्रकाची रक्कम. | निव्वळ टप्प्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १] | ६६ वुड हाऊस रोड | "अ" | पहिला [सु] | १२, ५०, ५११/- | १२, ५०, ५११/- |
| २] | २६७-२८३, एस. व्ह. पि. रोड, [२=४ काबिकर स्ट्रिट] | "ब" | दुसरा [सु] | १२, २२, ८६५/- | ९, ९०, ७२७/- |
| ३] | ४६ दुसरी कारपेंटर स्ट्रिट | सी-१/२ | दुसरा [सु] | ३, ७८, ९४८/- | २, ९४, ४४८/- |
| ४] | ८१-१२८, काळबादेवी रोड | सी-३/४ | पहिला [सु] | १९, ४६, ९९१/- | १९, ४६, ८९१/- |
| ५] | २ १३-बी, खेतवाडी, मेन रोड | डी-२ | दुसरा [सु] | १५, ४९, ७७७/- | १४, ३९, ९७७/- |

———— x ———— x ————

विदे/२६३९७.

[illegible] दुरुस्ती कामांच्या अंदाज पत्रकाची यादी

परिशिष्ठ- "ब"

| अ.क्र. [१] | इमारतीचा तपशिल [२] | विभाग [३] | दुरुस्तीचा टप्पा [४] | एकूण अंदाजपत्रकाची रक्कम [५] | निव्वळ टप्प्याची रक्कम [६] |
|---|---|---|---|---|---|
| १] | ३००-३०८, एन. स्ट्रिट, | "अ" | चौथा [सु] | ८१, ३३, ९०१/- | ६८, ४४, ९७५/- |
| २] | ३३ मेरी वेदर रोड | "अ" | दुसरा [सु] | ११, १८, ६११/- | १०, ३७, ३७१/- |
| ३] | २३ रघुनाथ दादाजी स्ट्रिट | "अ" | पहिला [सु] | ५, ८३, २२४/- | ५, ८३, २२४/- |
| ४] | ४६-४८, वीर नरिमन स्ट्रिट | "अ" | तिसरा | १४, ०४, २१४/- | १०, १५, ४१४/- |
| ५] | ६७-११५, जेल रोड [नॉर्थ] | "बी" | तिसरा [सु] | ३७, ८२, ९७३/- | २६, ०१, ५६७/- |
| ६] | ८३ झकेरीया मस्जिद स्ट्रिट | "बी" | पहिला [सु] | ११, ०८, ४०७/- | ११, ०८, ४०७/- |
| ७] | ११८ केशवजी नाईक रोड | -"- | दुसरा [सु] | १४, ०४, २०२- | ११, ३५, २०२/- |
| ८] | ५४ नानु बिल्डींग, तंडिल स्ट्रिट | -"- | चौथा | ५, ९०, ११२/- | २, ३०, ५४८/- |
| ९] | ४३/६१, बारा इमाम रोड किंवा ११/२१, डंकर रोड, २ री छेद गल्ली | सी-१/२ | दुसरा | ७, ०३, ६६१/- | ४, १९, ९५७/- |
| १०] | ४-६-८, मदन स्ट्रिट | -"- | तिसरा | ६, ४२, ००४/- | ३, ४७, १४६/- |
| ११] | २०७ सैफि ज्युबिली स्ट्रिट | -"- | दुसरा | ८, ३४, ५३७/- | ४, १५, ६५५/- |
| १२] | ३ अली उमर स्ट्रिट | -"- | दुसरा | २, ९०, १३४/- | २, २९, ३७६/- |
| १३] | ३४३, जे. एस. एस. रोड | सी-३/४ | तिसरा [सु] | २३, ६९, ५०४/- | २०, ०३, ३८२/- |
| १४] | १९१, एस. आर. टी. कॅव्हल लेन नं. ९ | -"- | तिसरा [सु] | ११, ९६, ११९/- | ८, ७७, ८७८/- |
| १५] | २०३, ठाकूरद्वार रोड | -"- | पहिला | ६७, २९२/- | ६७, २९२/- |

..२/-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| १६] | २१५-२१७, काळबादेवी रोड | सी-३/४ | पहिला | ५, ३३, १३९/- | ५, ३३, १३९/- |
| १७] | २२९-अ, राजाराम मोहन रॉय मार्ग | डी-१ | तिसरा [सु] | १७, २५, ९८३/- | ९, ५०, २६२/- |
| १८] | १७७ ऑप, व्ही. पी. रोड | -"- | दुसरा [सु] | १३, ८१, ३९७/- | १२, ६६, १२८/- |
| १९] | १३ सदाशिव लेन | -"- | तिसरा | ६, ३८, ५८८/- | ३, ४७, ०६२/- |
| २०] | २००-२०२, डॉ. व्ही. पी. रोड | -"- | पहिला | १२, २२, ९०७/- | १२, २२, ९०७/- |
| २१] | २४-२६, आप्पामाऊंट रोड [मनो माऊंट] | डी-२ | पहिला [सु] | १३, ५४, ६३२/- | १३, ५४, ६३२/- |
| २२] | ५२-५४, नौशिर भरुचा मार्ग, [स्लेटर रोड] | -"- | चौथा [पु.सु.] | ४९, २१, ७८९/- | ३२, ०१, ८०३/- |
| २३] | ६९-डी, भुलाभाई देसाई रोड, [illegible] [स्टेबल बिल्डींग] | [illegible] | दुसरा [सु] | ५, ४०, ७७२/- | ४, ५७, ६३६/- |
| २४] | २३१-२३५, डॉ. डी. बी. मार्ग [इशाक मंजील] | [illegible] | तिसरा, [सु] | २२, ८६, ८३१/- | १६, ९१, ५६५/- |
| २५] | ४ चुनाम लेन, [पंडीतालय] | -"- | दुसरा [सु] | ४, ६८, ७७०/- | ४, ३१, ७७०/- |
| २६] | १४१, ताडदेव रोड | -"- | तिसरा [सु] | २२, २३, ६२०/- | १४, १४, ८०८/- |
| २७] | १०१-१०९, खेतवाडी मेन रोड | -"- | तिसरा | ७, ६८, ९९०/- | ५, ०२, ६२४/- |
| २८] | ४५५-४७१, अ-४६३, आर्थर रोड [भटचाळ] | -"- | दुसरा | ९, ९९, ९४३/- | ८, ६८, ०५०/- |

×

९८

... अंतर्गत जेनर करण्यात आलेल्या उत्तर परिशिष्टातील दुरुस्ती कामाच्या अंदाज पत्रकाची यादी.

दिनांक ६.३.८७ रोजी झालेल्या बैठकीत [illegible] अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाज पत्रकाची यादी.

परिशिष्ट "क"

| अ.क्र. | इमारतीचा तपशिल | विभाग | दुरुस्तीचा टप्पा | एकूण अंदाजपत्रकाची रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| [१] | [२] | [३] | [४] | [५] | [६] |
| १] | इ.क्र. ५३७–५३८, अे.एन.एस.जोशी मार्ग | ई–२ | दुसरा | ४,३०,१८७/– | १,७०,४३१/– |
| २] | ५४–५६–६०, उंद्रीया स्ट्रिट | –"– | दुसरा | ५,१५,३२७/– | ३,४०,५३७/– |
| ३] | १११–अ, इंद्रारा निवास, भवानी शंकर रोड | अ.ग.उ. | तिसरा | ११,४२,३५१/– | ५,११,३४१/– |
| ४] | २५–२५–अे, २७–२७–अे, एस.वी. रोड | ई–२ | दुसरा | ५,०६,१३६/– | २,२४,१३६/– |
| ५] | १७५–अे, रामभाऊ भोगले मार्ग. | ई–१ | दुसरा | १,८५,६५०/– | ८३,५८९/– |
| ६] | १३९, १६१, व १३८–अे, सिताराम जाधव मार्ग, तनमिल लेन. | क.ग.द. | पहिला | २,१९,१३२/– | २,१९,१३२/– |
| ७] | ७८, रतन टेरेस, टी.एच.कटारीया मार्ग | क.ग.उ. | दुसरा | ६,६२,४९७/– | ५,१६,०४७/– |
| ८] | ३७, कामाठीपुरा ८ वी गल्ली | ई–२ | दुसरा | १,७०,६४८/– | १,२८,६६९/– |
| ९] | २७–अे, डी.पी. वाडी | ई–१ | पहिला | २,६६,७९९/– | २,६६,७९९/– |
| १०] | ६१८–६२०, ना.प.जोशी मार्ग [लक्ष्मी निवास] | ई–२ | चौथा | ८,४३,६२९/– | २,६९,६२५/– |
| ११] | ४१–४७, स्टेबल स्ट्रिट | ई–२ | पाचवा | २३,५०,६७९/– | ५,९३,९८१/– |
| १२] | ३७५, पी. ठाकरशी चाळ | क्र.द. | तिसरा | ७,२४,०५४/– | [illegible] |
| १३] | ७१–८३, हरी बिल्डींग, डॉ. बाटलीवाला लेन | –"– | दुसरा | ९,७२,०९५/– | [illegible] |
| १४] | २४६, [illegible] डॉ. [illegible] रोड | –"– | चौथा | [illegible] | ५,५२,२८६/– |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| १५] | २०-सी. डी. मोदी मार्ग, | फ. ग. ऊ. | दुसरा | ७, ७१, ७९६/- | ६, ५५, २९६/- |
| १६] | १३५-१३७, सुभाष लेन, रामभाऊ भोगलेमार्ग | ई-१ | दुसरा | १, ६१, ९७०/- | ६०, २३३/- |
| १७] | २५६-२५६-अे, आप्टेरोड | ई-२ | दुसरा | ३, १४, ३८४/- | २, ८४, ९०३/- |
| १८] | १९१-डी, १९३-डी, एल. जे. रोड | फ. ग. ऊ | चौथा | २६, ८८, ९५०/- | १७, ९७, ८२९/- |
| १९] | ३२-३२, ए. एल. बी. रोड ३ | फ. ग. ऊ. | दुसरा | ३, १६, ९५७/- | २, ६४, ६५७/- |
| २०] | १३३-अे, मेघवाडी डॉ. एस. एस. राव रोड | फ. ग. द. | पहिला [तु] | ११, ६७, ३७४/- | ११, ६७, ३७५/- |
| २१] | ८१-८३, इराणी चाळ, गोखले रोड | -"- | तिसरा [तु] | २६, ३२, ६२३/- | १५, ५२, ६७९/- |
| २२] | ६-अे, पहारो बिल्डींग नं. १, जे. पी. रोड | -"- | तिसरा [तु] | ११, ५४, ७९२/- | ११, ००, ५०९/- |
| २३] | ४९=५१, बी. जे. के. सावंत मार्ग | फ. ग. उ. | दुसरा [तु] | २९, ०९, १८३/- | २७, ३४, ०५८/- |
| २४] | ९१ तिताकुंज प्रकाश कोटणीस मार्ग | -"- | पहिला [तु. तु] | १, ९७, ०३९/- | १, ९७, ०३९/- |
| २५] | ९६-ए, डिसल्वेकर मार्ग | ई-१ | तिसरा [तु] | १९, ०५, ८१५/- | १०, ४०, २२३/- |
| २६] | १-३, ३-बी, ५-५-अे, ७-७-अे, बी, भवानी शंकर रोड | फ. ग. ऊ. | तिसरा [तु] | ६, ८१, ५६६/- | ४, ९४, ४४६/- |
| २७] | ६४-८४, तोफिया झुवेर रोड | ई-१ | तिसरा [तु] | ११, ४०, ७५४/- | ६, १७, ९६८/- |